# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
# राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र)

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र) मार्फत ''कार्यक्रम व्यवस्थापक'' ह्या पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत **कंत्राटी पद्धतीने** कार्यक्रम व्यवस्थापक ह्या पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार

| पद | पदांची संख्या | पात्रता | वयोमर्यादा | अनुभव | मानधन प्रतिमहा |
|---|---|---|---|---|---|
| कार्यक्रम व्यवस्थापक | १०० | बी.एस्सी (अॅग्रिकल्चर) बी टेक (अॅग्रिकल्चर) कृषी व्यवस्थापन वा समाजकार्य ह्या विषयातील पदवीधारक असावेत | ३० वर्षे | • ग्रामीण भागातील उपक्रमांचा किंवा ग्रामीण व्यवस्थापनाचा किमान २ वर्षांचा अनुभव असावा.<br>• इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे.<br>• ग्रामीण महाराष्ट्राबाबत ज्ञान असावे.<br>• महाराष्ट्रातील ग्रामीण व दुर्गम भागात काम करण्याची तयारी असावी. | रु.१५०००/- जिल्हा पातळीवर<br>रु.१६०००/- तालुका पातळीवर<br>रु.१७०००/ दुर्गम भागात |

**कामाचे पूर्ण वेळ स्वरुप:**

१. जिल्हा पातळीवर योजनेचे समन्वयन करण्यास उपजिल्हाधिकारी (रोहयो) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), जिल्हा परिषद यांना मदत करणे.

२. तालुका पातळीवर प्रत्येक तालुक्यात तहसीलदार (कार्यक्रम अधिकारी) व गट विकास अधिकाऱ्यास (सह कार्यक्रम अधिकारी) यांना योजनेचे समन्वयन करण्यास मदत करणे. तसेच सामाजिक अंकेक्षण, ग्राम रोजगार सेवकांचे विषय आणि रोजगार हमी योजना कायदे विषयक बाबी यांचे समन्वयन करणे.

**उमेदवारांकरिता विशेष सूचना:**

१. उमेदवारांची नियुक्ती फक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीकरिता आहे. सदर पदे योजनेच्या व्याप्तीप्रमाणे कमी अधिक करण्यात येतील. **ही नियुक्ती पूर्णत: कंत्राटी पद्धतीने अकरा महिन्यांकरिता असेल.** चांगल्या कामगिरीच्या आधारे आवश्यकतेनुसार नियुक्ती कालावधीत वाढ करण्यात येईल.

२. **मिटकॉन संस्थेची भूमिका:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र) ह्या सोसायटीने उमेदवारांची पूर्ण निवड प्रक्रिया करण्याकरिता मिटकॉन ह्या संस्थेस प्राधीकृत केले आहे.

विहित अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी त्यांची जन्म तारीख/शैक्षणिक पात्रता/अनुभव इ. प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडून परिपूर्ण अर्ज **दि. ११ जून, २०१२** पर्यंत मिटकॉन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सर्वे नं. ३३/१, छत्रपती शिवाजी क्रीडा संकुलासमोर, बालेवाडी, पुणे-४११ ०४५ ह्या पत्त्यावर पाठवावेत. फोन नं. ०२०-६६२८९६००

याविषयी अधिक माहिती व अटी-शर्ती करिता **www.egs.mkcl.org** किंवा **www.mitconindia.com** किंवा **www.mima.edu.in** वेबसाईट पाहावी.

**अर्जाचा नमुना वरील वेबसाईटवर, तसेच सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) कार्यालयांत उपलब्ध राहील.**

सही/-
पदसिद्ध उपाध्यक्ष
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**
राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र)

# विहीत नमुन्यातील अर्ज

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र)**
**(कंत्राटी पध्दतीने भरतीसाठी)**

जाहिरात दिनांक :

अर्ज केलेल्या पदाचे नांव :

---

फोटो

१. अर्जदाराचे नांव :

२. कायमचा पत्ता :

३. दूरध्वनी क्रमांक :

४. ई-मेल :

५. सध्याचा पत्ता:

६. जन्मतारीख : / / वय : वर्षे

७. राष्ट्रीयत्व :

८. जात व प्रवर्ग :

९. लिंग : विवाहित / अविवाहित :

१०. अवगत भाषा :

११. शैक्षणिक माहिती :

| परीक्षा | वर्ष | विषय | शाळा/कॉलेजचे नांव | बोर्ड/विद्यापीठ | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१२. इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादि)

| कोर्स | वर्ष | विषय | संस्थेचे (प्रायोजक) नांव | टक्के |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३. अनुभव :

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

मला पूर्णपणे माहित आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलबजावणीकरिता कंत्राटी पध्दतीने कार्यक्रम व्यवस्थापक या पदाकरिता उमेदवारांची नियुक्ति करण्यात येणार आहे. सदर पदे योजनेच्या व्याप्तीप्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. ही नियुक्ति योजनेच्या अंमलबजावणीकरिता असल्याने ती योजना चालू असेपर्यंतच असेल. ही नियुक्ति पूर्णत: कंत्राटीपध्दतीने ११ महिन्यांकरिता असेल.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही

## अटी व शर्ती

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलबजावणीकरिता कंत्राटी पध्दतीने कार्यक्रम व्यवस्थापक या पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे योजनेच्या व्याप्तीप्रमाणे कमी अधिक करण्यात येतील. ही नियुक्ती योजनेच्या अंमलबजावणीकरिता असल्याने ती योजना चालू असेपर्यंतच असेल. ही नियुक्ती पूर्णतःकंत्राटी पध्दतीने अकरा महिन्याकरिता असेल. चांगल्या कामगिरीच्या आधारे आवश्यकतेनुसार नियुक्ती कालावधीत वाढ करण्यात येईल.

२)वयोमर्यादा -३० वर्षे

३)पात्रता- बी.एस्सी (ॲग्रिकल्चर),बी टेक (ॲग्रिकल्चर), कृषी व्यवस्थापन वा समाजकार्य या विषयातील पदवीधारक असावेत.

४)अनुभव-

- ग्रामीण भागातील उपक्रमांचा किंवा ग्रामीण व्यवस्थापनाचा किमान २ वर्षाचा अनुभव असावा.
- इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व असावे.
- ग्रामीण महाराष्ट्राबाबत ज्ञान असावे.
- महाराष्ट्रातील ग्रामीण व दुर्गम भागात काम करण्याची तयारी असावी.

५) कामाचे पूर्ण वेळ स्वरुप :

१. जिल्हा पातळीवर योजनेचे समन्वयन करण्यास उप जिल्हाधिकारी (रोहयो) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), जिल्हा परिषद यांना मदत करणे.

२. तालुका पातळीवर प्रत्येक तालुक्यात तहसिलदार (कार्यक्रम अधिकारी) व गट विकास अधिकाऱ्यास (सह कार्यक्रम अधिकारी) यांना योजनेचे समन्वय करण्यास मदत करणे. उदा. मजुरांची नोंदणी,जॉबकार्ड देणे,काम देणे,मजुरांना कामाच्या ठिकाणी सुविधा व वेळेवर मजुरी प्रदान करणे ,सामाजिक अंकेक्षण,प्रशिक्षण, ग्राम रोजगार सेवकांचे विषय आणि रोजगार हमी योजना कायदे विषयक बाबी यांचे समन्वय करणे. या सर्व बाबीच्या अनुषंगाने योजना अंमलबजावणीचे समन्वय करणे.

६) कार्यक्रम व्यवस्थापक या पदाकरिता मराठी व इंग्रजीचे ज्ञान असणे अनिवार्य आहे.

७) अर्ज करणा-या उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हता/अनुभव/जन्मदिनांक इत्यादीच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात. मुलाखतीच्या वेळी प्रमाणपत्राच्या मूळ प्रती सादर करणे बंधनकारक आहे.

८)	रोजगार व स्वयंरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केलेली असल्यास अद्ययावत नोंदणी पत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

९)	फक्त याच जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. यापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणर नाही.

१०)	अपूर्ण भरलेले तसेच अर्हतेची प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज रद्द समजण्यास येतील.

११)	अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाले नाहीत किंवा उशीरा प्राप्त झाले तर विचारात घेतले जाणार नाहीत.

१२)	टपाल खात्याच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र) या सोसायटीवर राहणार नाही.

१३)	जाहीरातीत नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होऊ शकतो. तसेच उमेदवारांकडून आलेल्या अर्जाबाबतची प्रक्रिया रद्द करण्यात अथवा त्यात काही बदल करावयाचा झाल्यास हे संपूर्ण अधिकार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र) या सोसायटीस राहतील.

१४)	शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र ६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च २००३ नुसार उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे/वापराबाबतचे तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे अधिकृत MS-CIT किंवा D.O.E.A.C.C. या सोसायटीचे C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संगणक अर्हता प्रमाणपत्र म्हणून सादर करणे आवश्यक राहील.

१५)	जिल्हा स्तरावर लेखी परिक्षा घेण्यात येऊन त्यात उत्तीर्ण होणा-या उमेदवारांची पुणे अथवा नागपूर येथे मुलाखत घेण्यात येईल. या करिता स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१६)	निवड प्रक्रियेमध्ये लेखी चाचणी समाविष्ट असेल. ही लेखी चाचणी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असून त्यामध्ये सामान्य बुध्दिमत्ता, सांखिकीय अभियोग्यता, सामान्य ज्ञान व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्राथमिक माहिती इ. वर प्रश्न असतील, परीक्षेची रुपरेषा परिक्षेसाठी बोलविण्यात येणा-या पत्राबरोबर (कॉल लेटर) पाठविण्यात येईल.

१७)	उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी महाराष्ट्राच्या प्रत्येक महसूल विभाग निहाय व पात्र उमेदवारास नियुक्ती शक्यतो त्याप्रमाणे देण्यात येईल

१८)	परीक्षेचा प्रकार /पदांची संख्या/याबाबत अंशतः बदल करणे, परिक्षा स्थगित करणे, रदद करणे, पुढे ढकलणे याबाबतचे सर्व अधिकार पदसिध्द उपाध्यक्ष महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र) यांनी स्वतःकडे ठेवले आहेत.

१९)	विहित शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणित पत्रासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणित पत्रांसह त्यांचे अर्ज प्राथमिक छाननी मध्ये योग्य आढळल्यास त्यांना लेखी/चाचणी परीक्षेसाठी बोलविण्यात येईल. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदाच्या सर्व अर्हता पूर्ण करतात किंवा नाही. जर निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर असे दिसून आले की, उमेदवार विहित अर्हता पूर्ण करीत नाही, तर त्याची उमेदवारी रदद करण्यात येईल. लेखी परीक्षेसाठी पात्र ठरविलेल्या उमेदवारांना योग्य वेळी कळविण्यात येईल. लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार आवश्यक त्या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

२०)	निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२१)	विहित अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांनी त्यांची जन्म तारीख/शैक्षणिक पात्रता/अनुभव इ. प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडून परिपूर्ण अर्ज दि.११ जून,२०१२ पर्यंत मिटकॉन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, सर्वे नं. ३३/१, छत्रपती शिवाजी क्रीडा संकुला समोर, बालेवाडी, पूणे-४११ ०४५ या पत्त्यावर पाठवावेत. जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज पाठविणा-या उमेदवारांना जाहिरातील नमूद केलेल्या नियम व अटी लागू राहतील. तसेच ऑनलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**संपर्काकरिता**:-मिटकॉन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, सर्वे नं. ३३/१, छत्रपती शिवाजी क्रीडा संकुला समोर, बालेवाडी, पूणे-४११ ०४५. फोन क्र. ०२०-६६२८९६००

सही/-
पदसिध्द उपाध्यक्ष
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी**
**योजना राज्य निधी असोसिएशन (महाराष्ट्र)**